## मॅन्युअल-८

## निर्णय प्रक्रियेत अवलंबिली जाणारी पद्धत

सदरचा विभाग अतिरिक्त महापालिका आयुक्त (पश्चिम उपनगरे) आणि उप आयुक्त (आपत्कालीन व्यवस्थापन) यांच्या पर्यवेक्षणाखाली काम करत असल्यामुळे, सक्षम प्राधिकरणाची मान्यता व मंजुरी घेतल्यानंतर सर्व धोरणात्मक निर्णय घेतले जातात.

या विभागाला महानगरपालिकेने वेळोवेळी निर्धारित केलेली प्रमाणके व नियमांचे पालन करावे लागते. महानगरपालिकेची कार्यपद्धती व साखळी यानुसार निर्णय प्रक्रियेत आपत्कालीन व्यवस्थापन व मध्यवर्ती तक्रार नोंदणी विभागात केल्या जाणा-या खर्चाकरिता अथवा कामाच्या कंत्राटाच्या अंमलबजावणीकरिता उप आयुक्त (आपत्कालीन व्यवस्थापन), अतिरिक्त महापालिका आयुक्त (पश्चिम उपनगरे), स्थायी समिती (विशिष्ट प्रकरणी ) यांची पूर्व मंजुरी अथवा कार्योत्तर मंजुरी घ्यावी लागते. दैनंदिन कामकाजाचे स्वरुप म्हणजेच जनतेला माहिती देणे, त्यांच्या तक्रारींची नोंद घेणे, समन्वय साधणे ही कामे या कार्यालयाच्या अधिका-यांमार्फत केली जातात.